# जुन्या व नव्या करारांमधून पवित्र शास्त्रातील वृत्तांत आणि त्याला समांतर धर्मसिद्धांत पवित्र शास्त्रातील संदर्भांसह

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net

## प्राचीन कुलाधिपतींच्या काळातील ऐतिहासिक घटनासोबत कालांतराने घडलेल्या त्यासारख्याच घटना व संबंधित धर्मसिद्धांत

**उत्पत्ती** (पवित्र शास्त्रातील संबंधित धर्मसिद्धांत: देवाची नवी उत्पत्ती, नवा जन्म आणि पुनर्जन्म)

**जुना करार:** देवाने भौतिक, तात्पुरते जग निर्माण केले, उत्पत्ती 1-2.

**नवा करार:** देवाने आपल्या नव्या उत्पत्तीचा आरंभ केला. ही उत्पत्ती आध्यात्मिक सार्वकालिक व पाप विरहित अशी आहे. येशूच्या पुनरूत्थानाने नव्या उत्पत्तीचा आरंभ झाला, त्यामध्ये विश्वासणारे सहभागी होतात. मत्तय 28.

- आमची वाट पाहणारे नवे आकाश व पृथ्वी यांनी याची परिपूर्ती होईल, प्रकटी 21-22.
- आध्यात्मिक दृष्ट्या यामध्ये आमचा पुनर्जन्म झाला आहे (येशू समवेत निकदेम), योहान 3:1-7.

**आमचा प्रतिसाद:** जुन्या उत्पत्तीमध्ये देवाने आमच्यासाठी निर्माण केलेल्या चांगल्या गोष्टीबद्दल त्याला धन्यवाद द्या.

- येशू हा नव्या उत्पत्तीचे प्रथमफळ असा आहे, त्याच्या पुनरूत्थानामध्ये सहभागी झाल्याने आम्हाला देवाच्या नव्या, आध्यात्मिक व सार्वकालिक निर्मितीत प्रवेश करता येतो हे आनंदाने जाहीर करा, (1 करिंथ 15; 2 करिंथ 5:17). अन्य दुसरा मार्ग नाही (योहान 14:6).

**मोह** (संबंधित गोष्टी मूळ पातक, मरण, आदाम, सैतान, येशूने सैतान व मरण यांचा पराभव केला).

**जुना करार:** पहिल्या आदामाला सैतानाच्या मोहाची भुरळ पडली आणि देवाची आज्ञा मोडली, यामुळे मनुष्यावर मरण प्रसंग ओढवला आणि पवित्र देवापासून दुरावला (मूळ पातक): उत्पत्ती 3.

**नवा करार:** शेवटचा आदाम येशूने सैतानाचा मोह झुगारून देऊन जीवन आणले आणि मनुष्याचा देवाशी समेट घडवून आणला:

- येशू ''शेवटचा आदाम'' (1 करिंथ 15:45) याने सैतानाच्या मोहपरीक्षांचा प्रतिकार केला, मत्तय 4. आमच्या ठायी वसती करणारा येशू आम्हाला सैतानाचा प्रतिकार करण्यास व जगावर विजय मिळविण्यास सामर्थ्य देतो, योहान 16-17.
- येशूने गेथशेमाने बागेत पित्याच्या इच्छेचे अगदी मरण्याचेही (सर्वोच्च कसोटी) आज्ञापालन केले, मत्तय 26:36-42.

**आमचा प्रतिसाद:** आपली पातके कबूल करून पश्चात्ताप करा (1योहान 1:8-10).

- सैतानाला प्रतिकार करा. पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने देवाच्या शस्त्रसामग्रीचा उपयोग करा (याकोब 4:7; इफिस 6).

**काईन आणि हाबेल** (संबंधित गोष्टी : रक्ताचे सिंचन, ख्रिस्ताचे रक्त)

**जुना करार:** जुन्या करारातील उपासनेसाठी निर्दोष बळीचे रक्त शिंपडावे लागे

- देवाने काईनाचे रक्तरहीत अर्पण नाकारले; पण, हाबेलाचे मात्र अर्पण स्वीकारले, तेव्हा, काईनाने हाबेलाला जिवे मारले. तो पहिला खूनी होय. उत्पत्ती 4.
- देवाने त्याच्या पवित्रस्थानात रक्ताशिवाय प्रवेश करणाऱ्या मुख्य याजकाच्या मुलांना मारले. लेवीय 10.

**नवा करार:** नव्या करारच्या उपासनेमध्ये 'देवाचा कोकरा' सार्वकालिक ख्रिस्ताच्या रक्ताचा समावेश आहे:

- आम्ही येशूच्या शरीरातून खाल्ले पाहिजे आणि रक्तातून प्याले पाहिजे असे सांगून त्याने यहूद्यांना धक्का दिला, योहान 6:26-59.
- आम्ही देवाची उपासना आत्म्याने व खरेपणाने करणे अगत्याचे आहे, असे येशूने शोमरोनी स्त्रीला सांगितले, योहान 4.

**आमचा प्रतिसाद:** येशूने आमच्या पातकांसाठी सांडलेल्या रक्ताची आठवण करून शुद्ध मनाने अंत:करणपूर्वक देवाची उपासना करा (मत्तय 26:26-28).

- त्याने सांगितल्याप्रमाणेच प्रभुभोजनाचा विधी साजरा करा (1 करिंथ 10:16-17; 11:27-32).
- आमचा घसा कोरडा पडेपर्यंत ओठांनी आम्हाला देवाची स्तुती करता येईल, पण आम्ही त्याचे आज्ञापालन केले नाही तर आमची स्तुती व्यर्थ होईल (मत्तय 15:6-9).

**नोहा** (संबंधित गोष्टी: जलप्रलय, पश्चात्ताप, शिक्षा, न्याय, दुसरे मरण).

**जुना करार:** दुष्ट मानवजातीला देहांत मरणाची शिक्षा देण्यासाठी देवाने जलप्रलय पाठवला (नोहा) उत्पत्ती 6-9.

**नवा करार:** आम्ही पश्चात्ताप केला नाही; तर देव 'दुसऱ्या मरणाचा' इशारा देतो. हे मरण म्हणजे देवापासून कायमची फारकत आणि वास्तव्य नरकात, मत्तय 3.

- पश्चात्ताप करा, अभिवचनाने देऊ केलेला मसिहा, ख्रिस्तासाठी तयारी करा. यासाठी बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने मनुष्याला पाचारण केले.
- पश्चात्ताप न करणाऱ्या पातक्यांना देव अग्नीच्या सरोवरात टाकून शिक्षा देईल (शेवटचा न्याय व 'दुसरे मरण') प्रकटी 20:11-15.

**आमचा प्रतिसाद:** आमच्या पित्याची आस्था व दयाळूपणा या गोष्टी आम्हाला पश्चात्तापाकडे नेणाऱ्या ठराव्यात (रोम 2:4).

- आपल्या पातकांबद्दल पश्चात्ताप करून ख्रिस्तावर विश्वास ठेवा (मार्क 1:15).

**बाबेला संबंधित गोष्टी** (वंश, संस्कृती भाषा)

**जुना करार:** बाबेलच्या बुरूजाजवळ देवाने वंश आणि विविध संस्कृतींची निर्मिती केली:

- मनुष्याने एका अहंकारी समाजात एकत्र राहण्याचा प्रयत्न केला. देवाने त्यांची अनेक भाषांमध्ये विभागणी केली, उत्पत्ती 10.

**नवा करार:** सर्व वंश व संस्कृती देवाच्या सार्वकालिक राजासनासमोर गौरवात त्याची स्तुती करतील, प्रकटी 7:9-17

**आमचा प्रतिसाद:** माणसाच्या राजकीय सामर्थ्यापेक्षा देवावर भरवंसा ठेवा (जखऱ्या 4:6).

- स्वर्गामध्ये सार्वकाळ ओळखल्या जाणारे निरनिराळे वंश व संस्कृतींना समजून घ्या. त्यांना देवाने दिलेली विविधता सर्व राष्ट्रे जमाती व भाषांचे लोक 'ख्रिस्ताच्या वधूचे' सौंदर्य खुलवीत असतात (प्रकटी 7:9-12).
- सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा (सांस्कृतिक लोक गट, मत्तय 28:18-20).

**देवाने अब्राहामाला दिलेले अभिवचन** (संबंधित गोष्टी: अभिवचन, विश्वास, करार)

**जुना करार:** विश्वासणाऱ्या अब्राहामाच्या संततीद्वारे सर्व राष्ट्रांना आशीर्वादित करण्याचे अभिवचन देवाने दिले:

- अब्राहामाने देवावर भरवंसा ठेवला, त्याने त्याचा विश्वास नीतिमत्व असा गणला आणि देवाने विश्वासणाऱ्या अब्राहामाच्या संततीद्वारे वंशाद्वारे आशीर्वादांचे अभिवचन दिले आणि त्यावर कराराची मोहोर उमटवली, उत्पत्ती 12:1-7 उत्पत्ती 15.
- देवाने अब्राहामाला अद्‌भुत जन्माद्वारे पुत्र होईल असे अभिवचन दिले. अब्राहामाने त्याच्यावर विश्वास ठेवला, उत्पत्ती 15:1-6.

**नवा करार:** देवाने सर्व राष्ट्रांना अब्राहामाची संतती ख्रिस्त याच्याद्वारे आशीर्वादित करण्याचे आपले अभिवचन पूर्ण केले, ख्रिस्त पातकापासून तारतो आणि आरोग्य देतो:

- मरीयेने अद्‌भुतरित्या पुत्राला व तिच्या तारकाला जन्म देण्याचे मान्य केले, लूक 1:26-56.
- येशूने भूतग्रस्त मनुष्याला व इतरांना त्यांच्या विश्वासामुळे बरे केले, मार्क 1:21-34.
- येशूने, पक्षघाती मनुष्याच्या मित्रांच्या विश्वासामुळे त्याला बरे करून त्याच्या पातकांची क्षमा केली, मार्क 2:1-12.
- देवाने येशूचा स्वीकार करणाऱ्या अनेक राष्ट्रामधील यहूद्यांवर पवित्र आत्म्याचा वर्षाव केला (पेंटेकॉस्ट). प्रे. कृ. 2.
- देवाने आपला पवित्र आत्मा परराष्ट्रीयांना देऊन सर्व वंशांचे तारण होण्याचा मार्ग खुला केला. प्रे. कृ. 10:44-48.

**आमचा प्रतिसाद:** आमच्या स्वत:च्या गुणवत्तेने नाही तर विश्वासाच्याद्वारे देवाकडून पापक्षमा मिळवा. (इफिस 2:8-10).

- आपण अब्राहामाचे वारस आहोत. त्याच्याप्रमाणे विश्वास ठेवून त्याला अभिवचनाने देऊ केलेला आशीर्वाद आम्हाला मिळतो (गलती 3:6-12; 4:21-31).
- पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आम्ही सर्व राष्ट्रांतील लोकांना ख्रिस्ताची साक्ष देतो (प्रे. कृ. 1:8).
- आम्ही शारीरिक आरोग्य मिळावे यासाठी येशूच्या नावात प्रार्थना करतो (याकोब 5:14-16).
- आम्हाला आरोग्य देण्याची किंवा त्याऐवजी अन्य काही कृपा पुरविण्याची देवाला परवानगी द्या. त्याने पौलाच्या बाबतीत असेच केले (2 करिंथ 12:7-10. देव काही प्रत्येकालाच बरे करीत नाही, नाहीतर कोणीच मरणार नाही मग त्याच्याबरोबर स्वर्गात कोण राहणार!)

**अब्राहामाचा विश्वास** (संबंधित गोष्टी: विश्वास, इस्लाम, इसहाक)

**जुना करार:** अब्राहामाचा विश्वास सत्कृत्ये आणि देवाच्या अभिवचनाकडे घेऊन गेला, हाच जुन्या व नव्या अशा दोन्ही करारांचा आधारभूत पाया होता:

- अब्राहामाने आपल्या स्वार्थी पुतण्याला लोटाला समृद्ध गवताळ प्रदेशांची निवड करू दिली, उत्पत्ती 13.
- अब्राहामाने विश्वासाने आपले सेवक घेतले आणि लोटाची सुटका करण्यासाठी पाच राजांशी युद्ध केले, उत्पत्ती 14.
- अब्राहामाच्या विश्वासाचा परिणाम म्हणूनच इसहाकाचा जन्म झाला आणि त्याच्या द्वारेच देवाने आपला कृपेचा करार स्थापन केला, उत्पत्ती 21.
- देवाने अब्राहामाच्या विश्वासाची कसोटी पाहिली, त्याला त्याचा एकुलता एक पुत्र अभिवचनाने दिलेला वारस इसहाकाचे अर्पण करण्यास सांगितले, उत्पत्ती 22.

- तात्पुरत्या विश्वासाच्या अभावामुळे अब्राहामाने देवाचा कृपेचा करार त्याच्या स्वत:च्या प्रयत्नांनी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला, उत्पत्ती 16-17. याचा परिणाम असा झाला की, अरब मुस्लिम हागारचा दासीपुत्र इश्माएल याची संतती अद्याप सारेच्या द्वारे असलेल्या अब्राहामाच्या संतानांशी युद्ध करीत आहे.

**नवा करार:** नवा जन्म होणे, आरोग्य मिळणे व देवाचे आशीर्वाद मिळविणे यासाठी येशू आमच्याकडून विश्वासाची अपेक्षा करतो:

- येशूने निकदेमाला उलगडा करून सांगितले की विश्वासाच्याद्वारे आत्म्याने आमचा नवा जन्म होणे अगत्याचे आहे, योहान 3.
- येशूने विश्वास ठेवणाऱ्या शताधिपतीच्या सेवकाला बरे केले, मत्तय 8:5-17.
- येशूने दोन आंधळ्या माणसांना त्यांच्या विश्वासामुळे बरे केले, मत्तय 9:27-38.

**आमचा प्रतिसाद:** आमचे तारण विश्वासाने होते त्याचा परिणाम सत्कृत्यांमध्ये होतो, अन्यथा आमचा विश्वास हा खरा नाहीच (इफिस 2:8-10; याकोब 1:22-24).

- शंकांना थारा देऊ नका. अशा शंकेमुळेच अब्राहामाने देवाचा कृपेचा करार आपल्या स्वत:च्या प्रयत्नांनी पूर्ण करण्याचा खटाटोप केला, आणि इश्माएलाचा आणि त्याच्याद्वारे त्याच्या अरब संततीचा जन्म झाला, यातून इस्लामचा उदय झाला. हा जगातील अत्यंत कडवे धर्म नियम असणारा धर्म आहे (गलती 3:6-12; गलती 4:21-31).
- दररोज नवीकरणाचा शोध घ्या. दररोज प्रार्थना करून देवाचे वचन वाचा. देवाच्या पवित्र आत्म्याला आम्हाला दररोज नवे करू द्या (2 करिंथ 4:16).

**अब्राहामाचे कारभारीपण** (संबंधित गोष्ट: दान देणे)

**जुना करार:** देवाने जुन्या करारात चांगल्या कारभाऱ्यांकडे जे सोपवून दिले होते त्याबद्दल त्यांना प्रतिफळ दिले:

- अब्राहामाने हल्लेखोरांकडून जिंकून घेतलेल्या मालमत्तेचा दहावा भाग ख्रिस्तासमान मलकीसदेक याजकाला दिला आणि पाडाव केलेल्यांकडून काहीही घेण्यास त्याने नकार दिला, उत्पत्ती 14:11-24.
- बवाजने आपल्या कापणी करणाऱ्यांना गरीब रूथला सरवा वेचता यावा; म्हणून मागे काही धान्य तसेच सोडण्याची सूचना केली, रूथ 2.

**नवा करार:** देवाचे कार्य आणि गरजूंना उदारहस्ते दान देणाऱ्यांसाठी त्याने स्वर्गातील संपत्तीचे अभिवचन दिलेले आहे:

- गरीब विधवेने तिच्या स्वत:च्या उपजिविकेसाठीचे पैसेही दान म्हणून दिले, लूक 21:1:4.
- बर्णबाने आपली मालमत्ता विकून ती गरजूंना दिली, प्रे. कृ. 4:33-37.
- चांगल्या शोमरोनीने आपल्या शत्रूची शुश्रुषा केली, लूक 10:25-37.
- येशूने त्याच्या विश्वासू कारभाऱ्याच्या दृष्टांतातून चांगल्या कारभाऱ्याचे उदाहरण दिले, लूक 19:11-27.
- येशूने त्याच्या अविश्वासू कारभाऱ्याच्या दृष्टांतातून वाईट कारभाऱ्याचे उदाहरण दिले, लूक 16:1-8.

**आमचा प्रतिसाद:** चांगले कारभारी व्हा आणि देवाने तुम्हाला दिलेल्या गोष्टींची मग ते पैसे असोत वा वस्तू त्यांची उत्तम व्यवस्था ठेवा (1 करिंथ 4:2)

- संतोषाने द्या. आम्ही कुरकुर करीत दिलेले दान देवाला नको (2 करिंथ 9:6-15).

**अब्राहामाची मध्यस्थीची प्रार्थना** (संबंधित गोष्टी: विश्वास, मध्यस्थी, आरोग्य)

**जुना करार:** देवाने जुन्या करारामध्ये विश्वासाच्या प्रार्थनाची उत्तरे दिली.

- अब्राहामाने लोट व त्याचे कुटुंबिय यांच्यासाठी मध्यस्थीची प्रभावी प्रार्थना केली (सदोम व गमोर) उत्पत्ती 18-19.
- देवाचे मंदिर व त्याच्या लोकांसाठी शलमोनाने समर्पणाची प्रभावी प्रार्थना केली, 2 इतिहास 6;7:1-4.
- एज्राने आपल्या लोकांच्या वतीने पापकबूलीची प्रभावी प्रार्थना केली आणि त्याचे परिणाम (नवीकरण) एज्रा 9; एज्रा 10:1-19.

**नवा करार:** देव आमच्या विश्वासाच्या प्रार्थनांची उत्तरे देतो:

- पेत्र व योहान ह्यांनी येशूच्या नावाने प्रार्थना करून लंगड्या माणसाला बरे केले आणि याबद्दल त्यांना तुरूंगात टाकण्यात आले, प्रे. कृ. 3-4.
- एका पित्याने साध्या विश्वासाने प्रार्थना केली आणि त्याचा भूतग्रस्त मुलगा बरा झाला मार्क 9:14-29.
- पातकी जकातदाराची लहानशी प्रार्थना, लूक 18:9-14.
- येशूने आम्हाला प्रार्थना कशी करायची ते सांगितले (यात 'हे आमच्या पित्या' ह्या प्रभुच्या प्रार्थनेचा समावेश आहे), मत्तय 6:1-15.
- येशूने आपल्या शिष्यांसाठी आणि आमच्यासाठी प्रार्थना केली. योहान 17.
- येशूने प्रार्थनेमध्ये त्याच्या पित्याच्या इच्छेला स्वत:चे समर्पण केले, आपले जीवन आमच्यासाठी दिले, मत्तय 26:36-46.

**आमचा प्रतिसाद:** येशूने आमचा आनंद परिपूर्ण व्हावा म्हणून आम्हाला त्याच्या नावात प्रार्थना करण्यास सांगितले (योहान 16:24).

- प्रेषित पौल आम्हाला निरंतर प्रार्थना करण्यास सांगतो. (1थेस्सल 5:17).
- प्रेषित योहान आम्हाला आमची पातके देवाजवळ कबूल करण्यास सांगतो (1 योहान 1:8-10).

**इसहाकाची पत्नी रिबका** (संबंधित गोष्टी : इसहाक पेंटेकॉस्ट, पवित्र आत्मा)

**जुना करार:** अब्राहामाने आपल्या मुलासाठी इसहाक- विश्वासणारी पत्नी रिबका शोधण्यासाठी आपल्या सेवकाला दूर देशी पाठविले, उत्पत्ती 24.

**नवा करार:** देवाने आपला पुत्र येशू याच्यासाठी विश्वास ठेवणारी पत्नी - मंडळी शोधण्यासाठी पवित्र आत्म्याला पाठविले:

- येशूने कैवारी पाठविण्याचे अभिवचन दिले, तो आमच्या पातकांची खात्री पटवून देतो आणि आम्हाला ख्रिस्त प्रकट करतो, योहान 14:15-26; 16:7-16.
- पवित्र आत्मा पेंटेकॉस्टच्या दिवशी आला आणि यहूदी लोकांमधील पहिल्या मंडळीची सुरुवात झाली प्रे. कृ. 2
- पवित्र आत्मा परराष्ट्रीयांवर आला; पहिल्या परराष्ट्रीय मंडळीचा जन्म कर्नेल्याच्या घरी झाला, प्रे. कृ. 10

**आमचा प्रतिसाद:** देवाने आपली वधू होण्यासाठी निवडलेले विश्वासू, अगदी दूरवरच्या प्रदेशातील असले तरी त्यांचा शोध घ्या (मत्तय 28:19-20).

**याकोबाला देवाची कृपा मिळाली** (संबंधित गोष्टी: याकोब, एसाव, विश्वास, विश्वासाच्याद्वारे तारण)

**जुना करार:** सार्वभौम देव ज्यांची निवड करतो त्यांना तो कृपा पुरवितो आणि त्यासाठी तो त्यांची सत्कर्मे- सत्कृत्ये पाहात नाही:

- याकोबाने आपल्या भावाला एसावाला फसविले; पण, तरीही त्याला देवाकडून आशीर्वाद मिळाले. उत्पत्ती 27-33.
- ह्या दीर्घ वृत्तांतामुळे प्राचीन हिब्रू संस्कृतीत त्यांना देवाचे नियमशास्त्र मिळण्यापूर्वीच्या संस्कृतीमध्ये आम्हाला डोकावता येते.
- याकोबाने फसवून एसावाकडून त्याचा जन्मसिद्ध अधिकार हिरावून घेतला, उत्पत्ती 27.
- याकोबाने देवाची उपासना केली आणि त्याने स्वर्गात जाणारी शिडी पाहिली, अब्राहामाला दिलेली अभिवचने देवाने याकोबालाही दिली. उत्पत्ती 28.
- देवाने याकोबाच्या फसवणूकीची शिक्षा दिली. लाबानाने त्याची फसवणूक केली, उत्पत्ती 29.
- याकोबाने वाईट गोष्टी केल्या तरी त्याच्या विश्वासामुळे देवाने त्याला संपत्ती व मुलेबाळे देऊन आशीर्वादित केले, उत्पत्ती 30.
- देवाने लाबान व एसाव अशा दोघांच्याही रागापासून याकोबाचे रक्षण केले; याकोबाने देवदूताशी झुंज दिली, उत्पत्ती 31-33.

**नवा करार:** येशू वाईट लोकांना क्षमा करतो व आशीर्वाद देतो ते त्याच्या कृत्यांमुळे नाही तर विश्वासामुळे.

- येशूने पापी स्त्रीला क्षमा केली. लूक 7:36-50.
- येशूने देव चांगल्या व वाईट अशा दोघांनाही आपल्या बरोबर मेजवानीसाठी बोलावतो हे दृष्टांतातून स्पष्ट केले, मत्तय 22:1-10.
- येशू तो ज्यांना तारावयास आला होता त्या पातक्यांबरोबर खात-पीत असे आणि म्हणून त्याच्यावर टीका होत असे. लूक 5:27-32.

**आमचा प्रतिसाद:** देवाने आमच्या कृत्यांमुळे नाही तर आमच्या विश्वासामुळे आम्हाला पापक्षमा केली याबद्दल त्याचे आभार माना (रोम 8:28-30; 9:10-18).

- तारणाची सुवार्ता वाईट तसेच चांगल्या लोकांकडे घेऊन जा, कारण येशू हरविलेल्यांना शोधावयास आला (लूक 5:32).

**योसेफाने क्षमा केली** (संबंधित गोष्टी: पापक्षमा रदबदली येशू आमचा वकील)

**जुना करार:** योसेफाने त्याच्यावर अन्याय करणाऱ्या इस्राएलाच्या मुलांसाठी वकील म्हणून सेवा केली:

- योसेफाला सत्ता मिळाली आणि त्याला गुलाम म्हणून विकणाऱ्या भावांसाठी त्याने फारोकडे रदबदली केली, उत्पत्ती 37 आणि उत्पत्ती 39-45.
- या दीर्घ वृत्तांताचे लहान लहान भाग करून तुम्हाला अभ्यास करता येईल. यामध्ये पापक्षमा, शुद्धता, कौटुंबिक बंधने रदबदली आणि देवाची तरतूद याविषयीचे धडे आहेत. योसेफ हा ख्रिस्ताचे दर्शक प्रतिरूप होता, असा होता तो मेंढपाळ.

आपल्या वडिलांचा आवडता मुलगा,
आपल्या भावांकडून इस्राएल लोकांकडून विकण्यात आलेला,
मोहपरीक्षांचा प्रतिकार करणारा,
अन्यायाने तुरूंगवास घडलेला,
पुन्हा एकवार राजाच्या उजवी कडची मानाची जागा मिळविणारा,
आपल्या भावंडांसाठी रदबदली करणारा,

एका गौरवी मेजवानीच्या प्रसंगी त्यांच्याशी समेट झालेला.

**नवा करार:** येशू आम्ही त्याच्या विरुद्ध पातक केलेले असूनही, पित्यासमोर आमचा वकील होऊन रदबदली करीत आहे:

- येशू हरविलेल्या मेंढरांना शोधणारा उत्तम मेंढपाळ आहे, लूक 15:1-10.
- येशूने त्याला वधस्तंभावर खिळणाऱ्यांसाठी आपल्या पित्याकडे क्षमा करण्यासाठी प्रार्थना केली, लूक 23.
- येशूने आपण इतरांना क्षमा करणे अगत्याचे का आहे याबद्दल आपल्या शिष्यांना सांगितले. मत्तय 18:15-35.

**आमचा प्रतिसाद:** येशूच्या नावात प्रार्थना करा. तो पित्यासमोर आमच्यासाठी रदबदली करणारा आमचा वकील आहे (योहान 16:24; रोम 8:33-39).

- आमच्या विरुद्ध पाप करणाऱ्यांना क्षमा करा. (मत्तय 6:14-15; इफिस 4:32).

## नियमशास्त्र देणाऱ्या मोशेच्या काळातील घटना
## सोबत कालांतराने घडलेल्या त्यासारख्याच घटना

**देवाने मुक्तीदात्या मोशेला तयार केले** (संबंधित गोष्टी: मुक्तता, पातक, सुटका, तारण, सहभागिता, प्रभुभोजन, पवित्र सहभागिता)

**जुना करार:** देवाने आपल्या लोकांची मिसरमधील गुलामगिरीतून सुटका करून नवे, पवित्र राष्ट्र स्थापन करण्यासाठी एक मुक्तीदाता तयार केला:

- मोशेचा जन्म आणि त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न यांच्या आसपास अद्‌भुत चमत्काराच्या घटना घडल्या, निर्गम 1-2.
- देवाने आपल्या लोकांचे नेतृत्व करण्यासाठी मिद्यान देशात मोशेला तयार केले, जळत्या झुडूपातून त्याला मिसर देशास परत जाण्यास पाचारण करून आपल्या लोकांची सुटका करण्यास सांगितले आणि यासाठी त्याला अद्‌भुत सामर्थ्यही दिले. निर्गम 2-4.
- पाण्याचे रक्त करणे हा मोशेचा पहिला अद्‌भुत चमत्कार होय. मिसरच्या खोट्या दैवतांवरील शाप, निर्गम 7:13-25.

**नवा करार:** देवाने आपल्या लोकांची पातकाच्या गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी तारणाऱ्याची तरतूद केली.

- येशूचा जन्म आणि त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न या प्रसंगांच्या आसपास अद्‌भुत चमत्काराच्या घटना घडल्या, मत्तय 1:18-25; मत्तय 2.
- येशूची तयारी व बाप्तिस्मा आणि तो देवाचा परमप्रिय पुत्र असल्याची पित्याने दिलेली ओळख. मत्तय 3:13-17.
- येशूने केलेला पहिला अद्‌भुत चमत्कार पाण्याचा द्राक्षारस करणे एक आशीर्वाद, योहान 2.

**आमचा प्रतिसाद:** आमचा तारणारा व प्रभु येशू ख्रिस्त याच्यावर पापांची क्षमा व देवाचे आशीर्वाद मिळणे यासाठी भरवंसा ठेव (योहान 3:16).

**वल्हांडणाचा कोकरा** (संबंधित गोष्टी: पवित्र सहभागिता, सहभागिता कोकऱ्याचे रक्त, अर्पण, पुनरूत्थान)

**जुना करार:** देवाने इस्राएलासाठी बेखमीर भाकरीच्या सणाची (वल्हांडण) स्थापना केली, निर्गम 12. पाहा:

- देवाने आपल्या लोकांची मिसरमधील गुलामगिरीतून कशी सुटका केली हे युगानुयुग त्यांच्या लक्षात राहावे यासाठी ही व्यवस्था केली होती.
- मृत्युच्या दूताने दारांच्या कपाळट्ट्यांवर लाविलेले रक्त पाहिले आणि देवावर विश्वास ठेवणाऱ्यांचे घर ओलांडून तो पुढे गेला.

**नवा करार:** येशूने आपल्या रक्तातील नव्या करारावर शिक्कामोर्तब करण्यासाठी प्रभुभोजनाच्या विधीची स्थापना केली, लूक 22.

- त्याने आपले रक्त सांडून आम्हाला पातका4पासून कसे मुक्त केले याची आठवण आम्हाला युगानुयुग राहावी यासाठी हा विधी करतो.

**आमचा प्रतिसाद:** आम्ही हा नवा वल्हांडणाचा सण साजरा करतो तेव्हा आम्ही येशूचे शरीर व रक्त यामध्ये सहभागी होतो (1 करिंथ 10:16-17).

**गुलामगिरीतून सुटका** (संबंधित गोष्टी: गुलामगिरी, पुनरूत्थान, दुराचरण, तांबडा समुद्र)

**जुना करार:** देवाने तांबडा समुद्र पार करून इस्राएल लोकांची गुलामगिरीतून सुटका केली, हा अद्‌भुत चमत्कारच जुन्या करारासाठीचा ऐतिहासिक पाया आहे, निर्गम 12-13.

**नवा करार:** येशूने त्याच्या मरणातून झालेल्या पुनरूत्थानाच्याद्वारे आम्हाला पापाची गुलामगिरी व मरण यातून बाहेर काढले, लूक 24.

- ख्रिस्ताबरोबर विश्वासणारे सहभागी आहेत म्हणून तो आम्हाला सार्वकालिक जीवन देतो, योहान 11.

**आमचा प्रतिसाद:** आम्हाला अमरत्व देण्यासाठी आम्ही फक्त ख्रिस्तावर एकमेव जीवन देणाऱ्यावर भरवंसा ठेवतो (1 करिंथ 15).

**देवाने मान्ना आणि पाणी पुरविले** (संबंधित गोष्टी: जिवंत पाणी, सार्वकालिक जीवन, मान्ना, अमरत्व जीवनाची भाकर)

**जुना करार:** मोशेने देवाच्या अद्‌भुत चमत्कारांच्याद्वारे अन्न आणि पाणी पुरविले:

- देवाने खाण्यासाठी स्वर्गातून मान्ना पुरविला, निर्गम 17:1-7.
- देवाने खडकातून पाणी पुरविले, गणना 20:1-12.

**नवा करार:** येशू विश्वासणाऱ्यांना जीवनाची भाकरी (आपले स्वत:चे शरीर) आणि जिवंत पाणी (पवित्र आत्मा) पुरवितो:

- येशूने 5000 लोकांना अद्‌भुतरित्या जेवण आणि मग सार्वकालिक जीवनासाठी स्वर्गीय भाकरी म्हणून स्वत:चा देह दिला, अनेकांना हे रूचले नाही, योहान 6.
- येशूने आमच्या ठायी राहण्यास, योहान 7:36-39 आणि आमचे मार्गदर्शन करण्यास, योहान 14:15-26 देवाचा पवित्र आत्मा पाठविण्याचे अभिवचन दिले.

**आमचा प्रतिसाद:** भौतिक जगातून मिळणाऱ्या भाकरीपेक्षा स्वर्गातून मिळणाऱ्या खऱ्या भाकरीचा शोध करा आणि देवाचा आत्मा मिळवा (मत्तय 6:31-34; योहान 20:21-23).

**देवाने आपल्या लोकांसाठी मेंढपाळ दिले** (संबंधित गोष्टी: वडीलजन, इथ्रो)

**जुना करार:** देवाने जुन्या करारामध्ये आपल्या लोकांची काळजी घेण्यासाठी वडीलजनांची नेमणूक केली, निर्गम 18:12-27

**नवा करार:** देव आपल्या मंडळ्यांची काळजी घेण्यासाठी वडीलजनांची नेमणूक करतो, प्रे. कृ. 14 (पाहा वचन 23).

**आमचा प्रतिसाद:** नव्या क्षेत्रामध्ये अनुभवी नेते नसतात अशा वेळी मंडळी रोपण करणारे वडिलांची नियुक्ती करतात (तीत 1:5-9).

- देवाच्या मंडळ्यांमध्ये आमची काळजी घेणाऱ्या नेत्यांचे आम्ही ऐकतो. त्यांच्या आज्ञा पाळतो (इब्री 13:17).

**दहा आज्ञा** (संबंधित गोष्टी: जुना करार, नवा करार, येशूच्या आज्ञा, नियमशास्त्र)

**जुना करार:** देवाने दगडावर दहा आज्ञा कोरल्या इस्राएलाच्या वर्तणूकीसाठीचा पाया, निर्गम 17-20; निर्गम 31:18.

- देवाने नव्या कराराचे अभिवचन दिले त्याचे नियमशास्त्र दगडाऐवजी मनुष्याच्या अंत:करणांवर लिहिले पाहिजे, यिर्मया 31:31-34.
- जुन्या करारातील नियमांचे पालन न करणाऱ्यांचा वध केला जाईल, गणना 25:1-11

**नवा करार:** येशूने आम्हाला त्याच्या आज्ञाचे पालन करायला सांगितले. नव्या करारातील आमच्या वर्तणुकीचा पाया, मत्तय 28:18-20.

- येशू पायाचा खडक आहे; यावर केवळ त्याच्या वचनाचे आज्ञापालन केल्यानेच आम्हाला बांधकाम करता येते, मत्तय 7:24-29.
- आरंभीच्या मंडळीने येशूच्या सर्व आज्ञा बहुतेक जशाच्या तशा पाळल्या, प्रे. कृ. 2:37-47.
- त्यांनी पश्चात्ताप केला, विश्वास ठेवला आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला, मार्क 1:15; योहान 3:16, 20:22.

त्यांचा बाप्तिस्मा केला आणि त्याद्वारे बदलून जाणाऱ्या नवीन जीवनाची सुरुवात केली, मत्तय 28:18-20.

त्याचे एकमेकांवर प्रेम होते, त्यांची सहभागिता आणि गरजूंबदलची आस्था यातून हे दिसून आले, प्रेमामध्ये देवा, आमचे शेजारी सहविश्वासणारे, गरजू व्यावहारिक मार्गाने आणि शत्रू (क्षमा) ह्यांचा समावेश आहे, मत्तय 22:36-40; योहान 13:34-35; लूक 10:25-37; मत्तय 5:43-48.

त्यांनी भाकर मोडली (सहभागिता, आमच्या उपासनेशी संबंधित), मत्तय 26:26-28 योहान 4:24.

त्यांनी प्रार्थना केली (यामध्ये वैयक्तिक व कौटुंबिक भक्ती, मध्यस्थीची प्रार्थना आणि आध्यात्मिक युद्धाचा समावेश आहे), योहान 16:24.

त्यांनी दान दिले (यामध्ये आमचा वेळ, संपत्ती व बुद्धिकौशल्याचे व्यवस्थापन यांचा समावेश आहे), लूक 6:38.

त्यांनी लोकांना शिष्य केले (यात ख्रिस्तासाठी साक्ष देणे, काळजी घेणे, वचनाचे शिक्षण देणे, पुढाऱ्यांना प्रशिक्षित करणे आणि मिशनरी पाठविणे ह्या गोष्टीचा समावेश आहे), मत्तय 28:18-20.

- येशूने आम्हाला दिलेली मुख्य आज्ञा देवावर व माणसांवर प्रेम करा अशी असून यामध्ये जुन्या करारातील सर्व नियमांचा समावेश आहे, मत्तय 22:33-40.
- येशूने देवाच्या आज्ञांकडे दुर्लक्ष करून मनुष्यांच्या नियमांची अंमलबजावणी करणाऱ्या परूशांची कानऊघाडणी केली, मार्क 7:1-23; मत्तय 23.

**आमचा प्रतिसाद:** आम्हाला आता पवित्र आत्म्याने प्रेरणा दिलेली आहे, तो आमच्याठायी पवित्रपणाची फळे उत्पन्न करतो (रोम 8:3-16; गलती 5:14-26).

- आम्ही मरणाच्या जुन्या नियमातील कट्टरपणा टाकून जीवन व स्वातंत्र्याचा नवा करार स्वीकारतो (2 करिंथ 3:3-18).
- पवित्र आत्म्याला आपल्या पातकांची खात्री करून देऊ द्या (योहान 16:5-15).

**शब्बाथ विश्रांती** (संबंधित गोष्टी: कट्टरपणा नियमशास्त्र)

**जुना करार:** देवाच्या जुन्या करारामध्ये विसावा व उपासना यासाठी एक खास दिवस राखून ठेविलेला होता:

- देवाने जुन्या भौतिक जगाची निर्मिती केल्यावर घेतलेल्या विसाव्याकडे पाहता त्याने सातवा दिवस राखून ठेविलेला होता, निर्गम 20:8-11.
- देवाने शब्बाथ दिवशी लाकूड गोळा करणाऱ्याला दगडमार करून मारावे अशी, आपल्या लोकांना आज्ञा दिली होती. गणना 15:30-36.

**नवा करार:** देवाच्या नव्या करारामध्ये उपासनेसाठी खास दिवस नेमलेला आहे.

- विश्वासणारे नव्या, सार्वकालिक निर्मितीकडे पाहात. येशूचे पुनरूत्थान झाले त्या आठवड्याच्या पहिल्या दिवशी उपासना करतात, प्रे. कृ. 20:7.
- येशूने नव्या कराराची घोषणा केली. लूक 22:13-20.

**आमचा प्रतिसाद:** आम्ही नव्या कराराप्रमाणे चालतो हा करार आम्हाला पूर्ण करता न येणाऱ्या मृत्यूच्या नियमशास्त्रापासून आमची सुटका करतो (2 करिंथ 3:6-9).

- आम्ही जुन्या नियमशास्त्रातील कट्टरपणा टाळतो. जुन्या नियमानुसार सुंता करणे व खास सणाचे दिवस पाळणे आवश्यक होते (गलती 4:8-10; गलती 5:5-14).
- आम्ही कोणत्याही दिवशी उपासना करण्यास स्वतंत्र आहोत (रोम 14:1-18).

**मूर्तीपूजेबद्दल शासन केले** (संबंधित गोष्टी : सोन्याचे वासरू, लोभ)

**जुना करार:** देवाने सोन्याच्या वासराची उपासना करणाऱ्यांना शासन केले, निर्गम 32.

**नवा करार:** देव मूर्तीपूजा करणाऱ्यांना ह्या युगाच्या शेवटी भयानक पिडांची शिक्षा देणार आहे, प्रकटी 9.

**आमचा प्रतिसाद:** कोणत्याही प्रकारच्या मूर्तीपूजेपासून दूर राहा, लोभ करणे ही देखील मूर्तीपूजाच आहे (1 करिंथ 10:14; कलस्सै 3:5)

**अविश्वासू इस्राएल लोक चाळीस वर्षे रानात भटकत होते** (संबंधित गोष्टी: अवज्ञा, वचनदत्त प्रदेश, अग्रीप्पा)

**जुना करार:** देवाने इस्राएल लोकांना वचनदत्त भूमीचा आशीर्वाद देऊ केला; परंतु, विश्वासाच्या अभावामुळे त्यांना तो प्रदेश ताब्यात घेता आला नाही:

- बारा हेरांनी प्रदेशाची हेरगिरी केली पण लोकांनी तो प्रदेश घेण्याचे धाडस दाखविले नाही आणि म्हणून त्यांना चाळीस वर्षे रानात भटकावे लागले, गणना 13-14.

**नवा करार:** प्रेषित पौलाने अग्रीप्पा राजाला तारणाचा सुवार्ता संदेश सांगितला; पण, त्याने विश्वास ठेवण्यास नकार दिला, प्रे. कृ. 26.

**आमचा प्रतिसाद:** परमेश्वर प्राप्तीचा काळ आहे तोच आम्ही त्याला शोधले पाहिजे, यशया 55:6-7.

**निवासमंडप** (संबंधित गोष्टी: निवासस्थान, पवित्रस्थान, याजकगण, मुख्य याजक, येशू आमचा प्रमुख याजक)

**जुना करार:** देवाने मोशेला पवित्रस्थान उभारण्याची आज्ञा केली. या परमपवित्रस्थानामध्ये तो आपल्या लोकांची भेट घेतो:

- देवाने हा निवासमंडप उभारण्याविषयी व याजकांच्या पोशाखासंबंधाने कडक सूचना दिल्या होत्या निर्गम 35-31; निर्गम 35-40.
- लेवीयचे संपूर्ण पुस्तक अर्पणे आणि पवित्रस्थानातील याजकांची सेवा याबद्दलची माहिती देते.
- पवित्रस्थानाचे तीन भाग होते. ते पुढे दिलेले आहेत. प्रत्येक भागात स्वतंत्र सामानसुमान होते, निर्गम 40.

1) उपासकांसाठी आंगण- यामध्ये होमार्पणांसाठीची वेदी आणि याजकांना हात पाय धुण्यासाठीचे गंगाळ होते (निर्गम 37). वेदी हे ख्रिस्ताचा वधस्तंभ आणि सार्वकालिक तारण मिळवून देणारे त्याचे बलिदान यांचे प्रतिक होते. यामुळेच पशूंचे अर्पण करण्याची गरज उरली नाही (इब्री 9-10). गंगाळाची तुलना बाप्तिस्म्याशी करता येईल, याद्वारे सर्व विश्वासणारे स्वच्छ होतात आणि नव्या कराराचे याजक होतात.

2) केवळ याजकांसाठीचे पवित्र स्थान यामध्ये मेजावर ठेविलेली 'समक्षतेची भाकर' होती (प्रभुभोजनाचे प्रतिक), सोन्याचा दीपवृक्ष तेल घालून सतत तेवत ठेविलेला होता (पवित्र आत्म्याचे प्रतिक) आणि धूपवेदी (प्रार्थनेचे प्रतिक) होती.

3) परमपवित्र स्थान या ठिकाणी फक्त मुख्य याजक वर्षातून एकदाच जात असे. एक मोठा लाल रंगाचा पडदा या दोहोंच्या मध्ये होता, हे ख्रिस्ताच्या शरीराचे प्रतिक आहे. यामध्ये अत्यंत पवित्र असा कराराचा कोश होता, कोशाच्या पेटीला सोन्याने मढविलेले होते. त्यावर करूब (पवित्र देवदूत) होते, देवाचे दृश्य गौरव त्यावर तळपत होते. हे देवाची समक्षता त्याच्या लोकांमध्ये असल्याचे दर्शक होते, हे येशूचे प्रतिक होते.

- लोक निवासमंडपाच्या अंगणात त्यांच्या पातकांचे तात्पुरते प्रायश्चित म्हणून रक्ताचे अर्पण करीत असत, निर्गम 29:36-41.
- मुख्य याजकाच्या मुलांनी रक्ताशिवाय अशास्त्र अग्नी परमपवित्र स्थानी नेला, तेव्हा देवाने त्यांना भस्म केले. लेवीय 10.
- केवळ मुख्य याजकच वर्षातून एकदा परमपवित्रस्थानात प्रवेश करीत असे आणि देवाच्या लोकांसाठी प्रायश्चित म्हणून रक्त अर्पण करीत असे, लेवीय 16.
- शलमोन राजाने पुढे अनेक शतकांनी प्रचंड मोठा पण उचलून येणाऱ्या निवासमंडपाऐवजी भव्य दिमाखदार मंदिर बांधले, 1 राजे 5-6.

**नवा करार,** येशूने त्याचे मरण, पुनरूत्थान व स्वर्गारोहण याद्वारे आमचा प्रमुख याजक म्हणून स्वर्गीय निवासमंडपात प्रवेश केला:

- येशू मानवी देहधारण करून, मोहाचा सामना व दु:ख सहन करून आमचा परिपूर्ण मानवी याजक झाला, इब्री 2:14-18.
- येशू सदासर्वकाळ जिवंत आहे, त्याने जुना करार मुख्य याजक आणि संबंधित सर्व अर्पणे व सेवा यांची जागा घेतली, इब्री 7-9.

**आमचा प्रतिसाद:** विश्वासाने देवाच्या जवळ या, दृढ राहा आणि इतर विश्वासणाऱ्यांना प्रोत्साहन द्या (इब्री 10).

**महान आज्ञा- एकाच खऱ्या देवावर प्रेम करा** (संबंधित गोष्टी: मुले, विवाह)

**जुना करार:** देव एकच आहे- आम्ही त्याच्यावर संपूर्ण अंत:करणाने प्रीती करणे आणि त्याचे नियमशास्त्र पाळण्यास आमच्या मुलाबाळांना शिकविणे अगत्याचे आहे, अनुवाद 6:1-9.

**नवा करार:** येशूने विवाहाविषयी मार्गदर्शन केले आणि लहान बालकांना आशीर्वाद दिले, मत्तय

5:31-32; मत्तय 19:13-15.

**आमचा प्रतिसाद:** पतींनी आपआपल्या पत्नींवर प्रेम केले पाहिजे. पत्नींनी आपआपल्या पतींच्या अधीन राहिले पाहिजे (इफिस 5:21-33).

- पौल मुलांना आपल्या आईवडिलांच्या आज्ञा पाळण्यास सांगतो, तर वडिलांनी आपल्या मुलांना विश्वासामध्ये करावे अशी सूचना करतो (इफिस. 6:1-4).

**चेटूक जादूटोणा करण्यास मनाई** (संबंधित गोष्टी: आत्मे, गूढविद्या, येशूने दुष्ट आत्मे, भुते यांवर मात केली, सैतानाचा विनाश)

**जुना करार:** देवाने जादूटोणा, चेटूक करणे, मृतांशी किंवा आत्म्यांशी संपर्क करणे, या गोष्टींना मनाई करण्यास मोशेला सांगितले होते, अनु 18:9-12.

- शौल राजाने एनदोन येथील भूतविद्याप्रवीण स्त्रीला युद्धासंबंधाने प्रश्न विचाराला आणि देवाने त्याचे राज्य संपुष्टात आणले, 1 शमुवेल 28:6-25; 1 शमुवेल 31.

**नवा करार:** ख्रिस्ताने सैतानासह सर्व दुष्ट आत्म्यांवर मात केली:

- येशूने गरदेकराच्या प्रदेशातील लोकांमधील भूते काढून डुकरांमध्ये पाठविली तसेच अनेकांमधील भूते त्याने काढली, मत्तय 8:26-34; मत्तय 12:22-32.
- ख्रिस्त शेवटच्या काळात सैतान व त्याचे राज्य कायमसाठी संपविणार आहे, प्रकटी 12; प्रकटी 20:1-10.

**आमचा प्रतिसाद:** सर्वप्रकारचे चेटूक जाटूटोणा करणे टाळा आणि भूतबाधा झालेल्या व्यक्तींसाठी येशूच्या नावात प्रार्थना करा (गलती 5:19-21; लूक 10:9).

**अग्नीने परीक्षा** (संबंधित गोष्टी : स्वर्गातील संपत्ती, स्वर्ग)

**जुना करार:** देवाने आपल्या पवित्र छावणीत लूटीसाठी अमंगळ युद्ध करण्यास मनाई केली. रत्ने, माणके व मौल्यवान धातू अग्नीत टाकून बाहेर काढले पाहिजेत, गणना 31.

**नवा करार:** देवाने इशारा दिलेला आहे की आम्हाला निषिद्ध गोष्टी स्वर्गात नेता येणार नाहीत. आमच्या कृत्यांची परीक्षा अग्नीने केली जाईल, 1 करिंथ 3:10-15.

- येशूने आपल्या मूर्ख मनुष्याच्या दृष्टांतात हाव आणि द्रव्यलोभाविषयी इशारा दिलेला आहे, लूक 12:14-31.

**आमचा प्रतिसाद:** पृथ्वीवर धनदौलत साठविण्यापेक्षा स्वर्गात संपत्ती साठवा (मत्तय 6:19-21).

**बलामाने नाखुषीने दिलेला आशीर्वाद** (संबंधित गोष्टी: बलाम, हाव, द्रव्यालोभ, आदिभौतिकवाद, संपत्ती)

**जुना करार:** काही जणांनी देवाची सेवा करण्यासाठी आपली संपत्ती वापरली, तर काहींनी तिची अयोग्यप्रकारे लालसा केली वा स्वार्थीपणाने वापरली.

- इस्राएलाला शाप देण्यासाठी बालाकने बलामाला पैसे दिले. देवाने गाढवाच्याद्वारे व इतर मार्गांनी त्यांना आशीर्वाद देण्यास बलामाला भाग पाडले, गणना 22-24.
- धनाढ्य नाबालने दावीदाच्या भुकेल्या सैनिकांना जेवण देण्यास नकार दिला, पण देवाने परिस्थितीच बदलून टाकली, 1 शमुवेल 25.
- हिल्कीया राजाने बाबेलच्या जासूदांना सर्व भांडार दाखविले आणि शेवटी ते गमावून बसला! 2 राजे 20:12-19.
- शलमोन राजाकडे अमाप धनदौलत होती, अनेक बायका होत्या आणि त्यांचा त्याने यथेच्छ उपभोग

घेतला; पण हे सर्व व्यर्थ असल्याचे त्याला आढळले. उपदेशक 2:1-11.

**नवा करार:** येशूने नरकात गेल्यावर डोळे उघडलेल्या श्रीमंत माणसाच्या दृष्टांतातून संपत्तीचा साठा करण्याविषयी इशारा दिलेला आहे, लूक 16:19-31.

**आमचा प्रतिसाद:** संपत्ती असणारे किंवा ती मिळविण्याची इच्छा धरणाऱ्या विश्वासणाऱ्यांनी यामुळे आपल्याला दु:ख सहन करावे लागेल ह्या देवाच्या इशाऱ्याकडे लक्ष दिले पाहिजे (याकोब 5:1-6).

## इस्राएलाच्या शास्त्यांच्या काळातील घटनासोबत कालांतराने घडलेल्या त्यासारख्याच घटना

**यहोशवाने वचनदत्त प्रदेश ताब्यात घेतला** (संबंधित गोष्टी: युद्ध, मंडळी रोपण, मिशनरी)

**जुना करार:** यहोशवाने मूर्तीपूजक राष्ट्रांच्या ताब्यात असलेला वचनदत्त प्रदेश त्यांचा युद्धात पाडाव करून देवासाठी जिंकला.

- देवाने यहोशवाला खंबीर होऊन मूर्तिपूजक राष्ट्रांना बाहेर हाकलून देण्याची आज्ञा केली, यहोशवा 1:1-11.
- मूर्तीपूजक यरीहो शहराचा पाडाव, यहोशवा 6
- देवाने एका विश्वसघातक्याच्या मूर्तीपूजेमुळे यहोशवाच्या सैन्याचा तात्पुरता पराभव होऊ दिला, यहोशवा 7-8.
- यहोशवाने प्रदेश ताब्यात घेण्यासाठी अनेक बलाढ्य राजांचा सैनिकी मोहिमेत पराभव केला, यहोशवा 9-11.

**नवा करार:** प्रेषितांनी सैतानाचा पराभव करून जगातील मूर्तीपूजक राष्ट्रांकडे सुवार्ता नेली आणि त्यांना देवासाठी जिंकले.

- अंत्युखियामधील मंडळीने जबाबदारी सोपवून दीर्घ मुदतीच्या मोहिमेवर पहिले मिशनरी सेवक पाठविले, प्रे. कृ. 13:1-3.
- पौल व बर्णबा हे लांब पल्ल्याच्या सुवार्ता फेऱ्यांवर गेले. ते दूरदूरच्या देशांत तसेच अन्य संस्कृतींच्या लोकांकडे गेले, प्रे. कृ. 13-14; प्रे. कृ. 16-21.
- पौलाने त्याला तुरूंगवास घडणार होता तरीही, यहूदी पुढारी आणि फेस्त व अग्रिप्पा ह्या नास्तिक अधिकाऱ्यांसमोर येशूच्या नावाची घोषणा केली, प्रे. कृ. 20-26.

**आमचा प्रतिसाद:** देवाने तुमच्या मंडळीला दिलेल्या प्रेषितांना दुर्लक्षित क्षेत्रांकडे पाठवा (इफिस 4:11-12; प्रे. कृ. 1:8).

- देवाचे राज्य पृथ्वीवर सर्वत्र पसरत असताना आजही प्रेषित सातत्याने सैतानाला हाकलून देत आहेत (प्रकटी 15:4).
- देवाच्या शत्रूंचा धैर्याने सामना करा आणि त्याद्वारे होणारे दु:ख सहन करा (मत्तय 10:16-42).

**इस्राएलाच्या देवाने परराष्ट्रीयांना आशीर्वाद दिले** (संबंधित गोष्टी: राहाब, देवाच्या राष्ट्रामध्ये आणण्यात आलेले परराष्ट्रीय, ख्रिस्ताच्या मंडळीत सर्व राष्ट्रांचा समावेश आहे)

**जुना करार:** देवाने जुन्या करारात आपल्या इस्राएल लोकांमध्ये समावेश करण्यासाठी विश्वासू परराष्ट्रीय लोकांना आणले:

- कनानी वेश्या राहाब हिने विश्वासाने देवाच्या हेरांना लपण्यास जागा दिली आणि यरीहोचा पाडाव झाला

तेव्हा तिचा बचाव करण्यात आला, यहोशवा 2; यहोशवा 6:17.

- मवाबी विधवा रूथ आपली सासू नामी हिच्यावरील प्रेमापोटी इस्राएलमध्ये आली आणि देवावर विश्वास ठेवला. राहाब आणि रूथ ह्या दोघींचेही नाव ख्रिस्ताच्या वंशावळीत आहे. रूथ तर दावीद राजाची पणजी होती. रूथची एक सुंदर प्रेमकथा आहे.
- अरामाचा सेनापती नामानाने, आपल्या अहंकाराशी संघर्ष केल्यानंतर, यार्देन नदीमध्ये स्नान केले आणि देवाने त्याचे कोड बरे केले, 2 राजे 5.

**नवा करार:** ख्रिस्ताची मंडळी सर्व राष्ट्रांना सामावून घेते.

- येशूने सीदोन येथील बाईची परीक्षा पाहिली आणि मग प्रतिफळ दिले. मत्तय 15:21-28.
- येशूने रोमन शताधिपतीच्या चाकराला बरे केले. ते सैन्याच्या सेनापतीच्या विश्वासामुळे, लूक 7:1-10.
- प्रेषित पौल अनेक राष्ट्रामध्ये सुवार्ता फेऱ्यांवर गेला, प्रे. कृ. 13-14; प्रे. कृ. 17-20.

**आमचा प्रतिसाद:** येशूने आपल्याला सर्व राष्ट्रांमध्ये जाऊन सुवार्ता सांगण्याची व शिष्य करण्याची आज्ञा दिलेली आहे, लूक 24:46-48, मत्तय 28:18-20.

**गिदोनाला अशक्तपणात सामर्थ्य मिळाले** (संबंधित गोष्टी: गिदोन, दावीद गल्याथाला मारतो, पेत्राचा नकार, आध्यात्मिक युद्ध)

**जुना करार:** देवाने जुन्या करारामध्ये बलवानांचा पराभव करण्यासाठी अशा दुर्बल लोकांचा उपयोग केला:

- गिदोनाने 300 सैनिकांसह देवाच्या आश्चर्यकारक सूचनांचे पालन केले आणि मोठा पराभव केला, शास्ते 6-7.
- कोवळ्या वयाच्या दावीद मेंढपाळाने पलिष्टी राक्षसाचा पराभव केला, 1 शमुवेल 17.

**नवा करार:** देवाने नव्या करारामध्ये महान गोष्टी करण्यासाठी दुर्बल आणि दुबळ्या लोकांचा उपयोग करून घेतला:

- पेत्राने येशूची ओळख नाकारली; परंतु, त्याला पवित्र आत्मा मिळाल्यावर देवाने त्याचा महान रीतीने उपयोग करून घेतला. मत्तय 26:31-35, 69-75.

**आमचा प्रतिसाद:** आपली पातके आणि दुर्बलपणा देवाजवळ कबूल करा.

- मनुष्याचे ज्ञान व संपत्ती यापेक्षा देवाच्या सामर्थ्यावर भरवंसा ठेवा (1 करिंथ 1-2).
- ''ख्रिस्ताच्या सामर्थ्याद्वारे मी सर्व काही करावयास शक्तीमान आहे'' (फिलिप्पै 4:13) असे म्हणणाऱ्या पौलाप्रमाणे सामर्थ्य मिळावे यासाठी प्रार्थना करा.
- देवाने देऊ केलेली आध्यात्मिक शस्त्रसामग्री व शस्त्रे घेऊन आध्यात्मिक युद्धाला तोंड द्या (इफिस 6:10-18).

**रूथ** (संबंधित गोष्टी: महिला पुढारी, महिलांचा सन्मान करणे)

**जुना करार:** देवाने रूथ, दबोरा आणि एस्तेर यांसारख्या विश्वासू स्त्रियांना त्याचे कार्य करण्यास साहाय्य केले.

- दबोराने इस्राएलाची सुटका करण्यासाठी एका धाडसी सैनिकी मोहिमेचे नेतृत्व केले, शास्ते 4-5 तसेच रूथ व एस्तेर ही पुस्तकेही वाचा.

**नवा करार:** देवाने नव्या करारातील विश्वासू स्त्रियांना त्याचे कार्य करण्यास सामर्थ्य दिले.

- मरीया प्रभूची दासी होण्यास राजी झाली आणि तिने स्तुतीपर प्रार्थना म्हटली, लूक 1:22-56.
- प्रिस्किल्ला आपल्या पतीबरोबर तंबू तयार करीत असे. तिच्या मदतीमुळे अनेक मंडळ्या सुरू झाल्या तसेच अपुल्लोसालाही साहाय्य केले, प्रे. कृ. 18.
- दुर्कस गरीबांसाठी अंगरखे व वस्त्रे करीत असे. प्रे. कृ. 9:36-43.

**आमचा प्रतिसाद:**

- स्त्रियांचा आदर करून त्यांना मान द्या आणि सद्‌गुणी विश्वासू स्त्रियांची प्रशंसा करा. (नीतिसूत्रे 31:10-31; इफिस 5:21-33).
- देवाने दिलेल्या दानांचा सेवाकार्यासाठी उपयोग करण्यासाठी ख्रिस्ती स्त्रियांना प्रोत्साहन द्या. (उदा. फिलिप्पच्या मुली, प्रे. कृ. 21:8-9).

**पलिष्टी लोकांनी अत्यंत पवित्र असा कराराचा कोश हस्तगत केला** (संबंधित गोष्टी: शिक्षा, दु:ख सहन करणे, कराराचा कोश, स्तेफन, छळ, रक्तसाक्षी)

**जुना करार:** देवाने आपल्या चुकणाऱ्या मुलांना दुष्ट लोकांकरवी शासन केले; तसेच नीतिमान लोकांनाही दु:ख भोगायला भाग पाडले, हे सर्व त्यांच्या कल्याणाकरिता भल्यासाठीच केले.

- देवाचे लोक मूर्तीपूजेच्या आणि इतर पातकांच्या आहारी कसे गेले आणि मग मूर्तिपूजक लोकांकडून त्याची दडपशाही कशी झाली याची उदाहरणे शास्तेच्या पुस्तकात पहायला मिळतात. त्यांनी पश्चात्ताप केल्यावर देवाने सुटका करणाऱ्याला पाठविले आणि त्यांनी पुन्हा पातक करेपर्यंत ते शांतीने राहिले, ह्या चक्राची पुनरावृत्ती होत राहिली.
- शमशोनाचे नैतिक अध:पतन झाले तरी, मूर्तिपूजा करणाऱ्या पलिष्टी लोकांपासून इस्राएलाची सुटका करण्यासाठी देवाने त्याचा उपयोग केला, शास्ते 14-16.
- पलिष्टी लोकांनी कराराचा कोश हस्तगत केला आणि तो मत्स्य देव दागोनाच्या मंदिरात ठेवला. तिसऱ्या दिवशी दागोनाचे शीर तुटून पडले. येशूने देखील जुनाट सर्प सैतानाच्या पूर्वीच्या मृत्यूच्या जगात प्रवेश केला आणि तो तिसऱ्या दिवशी पुन्हा उठला, बंदिवानांना मुक्त करण्यासाठी त्याने सैतानाचे डोके चेपले. गाडीला जुंपलेल्या गायींनी कराराचा कोश इस्राएलमध्ये परत नेला. त्यावर कोणी गाडीवान नव्हता. विजयी ख्रिस्ताने देखील पुनरूत्थानानंतर आपल्या शिष्यांना दर्शन दिले आणि तो गौरवात वर घेतला गेला. 1 शमुवेल 4-6.
- ईयोब नीतिमान मनुष्य होता; पण, त्याने पराकोटीचे दु:ख सोसले, त्याने देवाला प्रश्न विचारला, ईयोब 1-42 (हा अंत्यत दीर्घ असा वृत्तांत आहे, तो थोडक्यात सारांशरूपाने सांगितला किंवा त्याचे भाग करून शिकविला पाहिजे. ईयोब 1-4 आणि 40-42 हे प्रमुख अध्याय आहेत).

**नवा करार:** देव आता आम्हाला दु:ख सोसायला भाग पाडतो, जेणेकरून आम्हाला नंतर त्याच्या गौरवात सहभागी होता येईल; देव त्याच्या मुलांना त्रास देणाऱ्यांना शासन करतो:

- हेरोद राजाने बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा शिरच्छेद केला आणि याकोब व इतरांना ठार मारले; परंतु, काही काळाने किडे पडून त्याचा मृत्यू झाला, प्रे. कृ. 12.
- विश्वास न ठेवणाऱ्या यहूदी लोकांनी दगडमार करून स्तेफनाला जिवे मारले आणि ख्रिस्ती लोकांचा छळ केला. याचा परिणाम असा झाला की ख्रिस्ती लोक अनेक ठिकाणी पांगले गेले, सुवार्ता सगळीकडे पसरली. त्यातून अनेकांना आशीर्वाद मिळाले, प्रे. कृ. 7-8.

- प्रेषित पौलाला यहूद्यांनी मारहाण व दगडमार केली, त्याला लुटारूंनी लुटले तसेच त्याचे गलबतही फुटले, 2 करिंथ 11:22-33, प्रे. कृ. 27-28.

**आमचा प्रतिसाद:** ख्रिस्तासाठी आपल्याला दु:ख सहन करावे लागते, तेव्हा आनंद करा कारण गौरवात आम्हाला मिळणारे प्रतिफळ महान आहे (1 पेत्र 4:12-19).

- जगात आम्हाला त्रास सहन करावा लागतो कारण जगाने ख्रिस्ताचा द्वेष केला आणि आमचाही ते द्वेष करते, परंतु आम्हाला प्रतिफळ मिळणार आहे (योहान 15:18-27; रोम 8:17-39).
- येशूने आपल्याला दिलेला वधस्तंभ वाहा (लूक 9:22-26).

## इस्राएलाच्या राजांच्या काळातील घटना सोबत कालांतराने घडलेल्या त्यासारख्याच घटना

**देवाने इस्राएलाच्या पुढाऱ्यांना तयार केले** (संबंधित गोष्टी: शमुवेल, हन्ना, एली, शौल राजा, यशया, प्रेषितांची तयारी)

**जुना करार:** देवाने योसेफ मोशे व दानीएल यासारखे आपले संदेष्टे आणि पुढारी निरनिराळ्या मार्गांनी तयार केले:

- मोशेने मिसरच्या राजवाड्यातील धन संपत्ती सोडली आणि आपल्या लोकांची सेवा करण्यासाठी त्याने विटंबना सोसली (इब्री 11:24-28).
- हन्नाने देवाची सेवा करण्यासाठी आपला मुलगा शमुवेल याला मुख्य याजक एलीच्या हाती सोपविले; शमुवेलाला एलीसाठी धक्कादायक संदेश मिळाला, 1 शमुवेल 1-3.
- इस्राएल लोकांनी त्यांचे पुढारीपण करण्यासाठी राजाला अभिषेक कर अशी शमुवेलाला गळ घातली; याचे परिणाम काय होतील याचा त्याने त्यांना इशारा दिला, पण त्यांनी आपला हेका सोडला नाही, म्हणून त्याने लोकांच्या समाधानासाठी बलशाली योद्धा अशा शौलाचा अभिषेक केला, 1 शमुवेल 8-10.
- शौलाने चांगला राज्यकारभार केला, इस्राएलाच्या अनेक शत्रूंचा पराभव केला, पण मग नंतर त्याने काही गंभीर अशा घोडचुका केल्या, 1 शमुवेल 11:15.
- मोशेप्रमाणे दावीद देखील तरुण वयात आपल्या वडिलांची इशायाची मेंढरे राखता राखता चांगला मेंढपाळ होण्यास शिकला, 1 शमुवेल 16; 1 शमुवेल 17:33-37.
- दावीद चांगला बलवान योद्धा झाला; परंतु, शौल राजा त्याचा द्वेष करू लागला आणि त्यामुळेच दावीदाला पळण्यास व लपून राहण्यास भाग पाडले. देवाने दावीदाला त्याच्यावर भरवंसा ठेवण्यास शिकविले (त्याच्या अनेक स्तोत्रांमध्ये याचे प्रतिबिंब दिसते), 1 शमुवेल 18-31 ह्या अध्यायांमध्ये युद्धाचे वृत्तांत आहेत.
- यशयाला प्रभूचा त्याच्या मंदिरात भयप्रद असा दृष्टांत झाला आणि त्याला स्वत:च्या पापीपणाची जाणीव होऊन तो खाली पडला, यशया 6.
- यिर्मयाने अनेक गोष्टी सोसल्या. यरूशलेमेचा पाडाव होणार असे त्याने भाकीत केले तेव्हा त्याला विहिरीत ढकलून देण्यात आले, यिर्मया 38.

**नवा करार:** देवाने नव्या करारामध्ये आपले नेते तयार केले:

- पेत्र आणि इतर अकरा मूळ प्रेषित प्रभु येशू बरोबर तीन वर्षे राहिले, मार्क 3:13-19.
- प्रेषित पौलाने अनेक गोष्टी सोसल्या आणि आपले प्रेषितीय कार्य सुरू करण्यापूर्वीचा वेळ त्याने अरबस्तानात घालविला, गलती 1:11-24.

**आमचा प्रतिसाद:** आम्ही प्रभूची सेवा करण्यासाठी चांगली तयारी करतो. यात त्याग करण्याचाही समावेश आहे:

- या तयारीमध्ये देवाच्या वचनाचा अभ्यास, जसा तुम्ही आता करीत आहात आणि ते तुमचे कुटुंब लोक व नवे पुढारी ह्यांना शिकविणे या गोष्टीचा समावेश आहे (2 तीमथ्य. 2:2).

**इस्राएलाचे चांगले राजे** (संबंधित गोष्टी: दावीदाचा उत्तम राज कारकीर्द शलमोन, आज्ञापालन शबाची राणी, इस्राएलाचे चांगले राजे, वडील जन)

**जुना करार:** देवाने, त्याचे लोक मूर्ती सोडून त्याचे आज्ञापालन करू लागले तेव्हा दावीद व त्याचा मुलगा शलमोन यासारख्या चांगल्या नेत्यांना आपल्या लोकांवर राज्य करू दिले आणि ते मूर्तीपूजा करू लागले तेव्हा दुष्ट राजांना निष्ठुरपणे त्यांच्यावर राज्य करू दिले. बहुतेक राजे दुष्टच होते:

- शलमोनाने देवाकडे ज्ञान मागून आपल्या राज्याची सुरुवात केली. त्याच्या सूज्ञ निर्णयांनी दूरवरच्या लोकांना आकर्षित केले, 1 राजे 3; 4:21-34.
- शलमोनाने देवाचे मंदिर बांधले आणि त्यामध्ये कराराचा कोश मोठ्या थाटामाटात मिरवत आणून ठेवला, 1 राजे 8.
- शबाची राणी शलमोनाचे गौरव पाहण्यासाठी फार दूरवरून आली आणि त्याचे ज्ञान व संपत्ती पाहून आश्चर्यचकित झाली, 1 राजे 10:1-13.
- शलमोनाच्या राजवटीत इस्राएलाने अपार भरभराट अनुभवली, 1 राजे 10:22-29.
- यहोशाफाट राजाने मूर्ती काढून टाकल्या आणि सर्व इस्राएल लोकांना देवाचे नियमशास्त्र निरंतर शिकविले, 2 इतिहास 17-18.
- पोरसवदा योशीया राजाने आपल्या सल्लागारांचे ऐकून इस्राएल मध्ये आध्यात्मिक संजीवन आणले, 2 राजे 22-23.
- हिज्किया राजाने उज्जीया व आसा ह्या राजांप्रमाणे यहूदाची भरभराट केली, 2 इतिहास 29-32.

**नवा करार:** देवाने, त्याच्या मंडळ्यांनी त्याच्या वचनाचे व पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाचे पालन केले तेव्हा त्याने त्यांना सेवेसाठी चांगले पुढारी दिले:

- क्रेतातील नव्या मंडळ्यांची देखभाल करण्यासाठी योग्य वडिलांची नावे निवडण्याची सूचना पौलाने आपला उमेदवार तीताला सांगितले, तीत 1:5-9.

**इस्राएलाचे संदेष्टे** (संबंधित गोष्टी: इशारा, एलीया बआल, पश्चात्ताप, खोटे पुढारी)

**जुना करार:** देवाने दुष्ट राजांना व लोकांना पश्चात्ताप करा असा इशारा देण्यासाठी आपल्या संदेष्ट्यांना पाठविले:

- शलमोनाच्या मूर्ख अविचारी मुलाने रहबामाने लोकांवरील जुलमी करात सवलत देण्यास नकार दिला, यामुळे यराबाम व उत्तरेकडील वंश विभक्त होण्यास प्रवृत्त झाले. राज्याचे उत्तरेकडे इस्राएल तर दक्षिणेकडे यहूदा असे दोन भाग झाले, 1 राजे 12.
- यराबाम ह्या उत्तरेकडील इस्राएलाच्या पहिल्या राजाने संदेष्ट्याने दिलेल्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करून दुष्ट मूर्तिपूजेची स्थापना केली 1 राजे 13.
- अनेक राजांनी यराबामाचा वाईट आदर्श पुढे ठेवला. अहाब राजाने तर बहुतेक सर्वच इस्राएलला मूर्तीपूजा करण्याची परवानगी दिली, परंतु देव जिवंत आणि निर्जीव मूर्तीपेक्षा अधिक सामर्थ्यशाली आहे हे दाखवणारी अद्‌भुत कृत्ये एलीया संदेष्ट्याने केली. एलीयाने विधवेच्या मुलाला बरे केले, 1 राजे 17.

एलीयाने बआलच्या संदेष्ट्यांनी त्याला व अहाबला कर्मेल डोंगरावर कसोटीसाठी येऊन भेटावे असे आव्हान दिले, 1 राजे 18.

एलीया एकाकीपणा वाटून निराश झाला पण देवाच्या देवदूताने त्याला अन्नपाणी दिले, 1 राजे 19.

एलीयाने अत्यंत दुष्ट राजा अहाब याला पश्चात्ताप करण्यास राजी केले, 1 राजे 21.

अहाबने मीखायाची भविष्यवाणी धुडकावून लावली आणि आपल्या स्वत:च्या आत्याचारी मरणास कारणीभूत ठरला, 1 राजे 22.

एलीयाने दुष्ट राजा अहज्याच्या दूतांवर स्वर्गातून अग्नीचा वर्षाव केला. 2 राजे 1.

एलीयाला प्रभूने अग्नीच्या रथातून स्वर्गात नेले पण त्याचे सामर्थ्य त्याचा शिष्य अलीशाला दिले, 2 राजे 2.

अलीशाने इस्राएलाचा राजा यहोराम याला मवाबी सैन्यावर अद्‌भुतरित्या विजय मिळविण्यास साहाय्य केले, 2 राजे 3.

अलीशाने देवाच्या सामर्थ्याने एका विधवेला तिचे कर्ज फेडण्यास मदत केली, 2 राजे 4.

अलीशाने देवाच्या सामर्थ्याने अरामाच्या सैन्याच्या सेनापतीचे नामानाचे कोड बरे केले, 2 राजे 7:24-33; 2 राजे 8.

- यिर्मयाने देवाचा कोप व यरूशलेमेच्या पाडावाचे भविष्य वर्तविले होते पण राजाने ते ऐकण्यास नकार दिला, 2 इतिहास 36:11-23; यिर्मया 36.
- राजे आणि लोक अधिकच दुष्ट झाले आणि शेवटी यरूशलेमेचा पाडाव झाला. अनेकांना बाबेलास बंदिवान करून गुलाम म्हणून नेण्यात आले, 2 इतिहास 36.
- योना हा इतर राष्ट्राकडे पाठविलेला पहिला मिशनरी, देवाने त्याला आज्ञापालन करण्यास शिकवेपर्यंत तो देवाच्या आज्ञेचा प्रतिकार करीत राहिला, योनाचे पुस्तक.

**नवा करार:** येशूने सर्व मनुष्यांना पश्चात्ताप करण्यास पाचारण केले आणि देवाच्या लोकांना बहकविणाऱ्या लांडग्यांना दुष्ट पुढाऱ्यांना इशारा दिला:

- येशूने एका पाप्याने पश्चात्ताप केल्यावर स्वर्गात कसा आनंद होतो हे दाखविण्यासाठी हरविलेल्या मेंढराचा दाखला दिला, लूक 15:1-10.
- येशूने देवाची कृपा मनुष्याला पश्चात्ताप करण्यास प्रवृत्त करते हे त्याने आपल्या उधळ्या पुत्राच्या दाखल्यातून दाखविले, लूक 15:11-32.
- पेत्राने सुवार्तेची घोषणा केली आणि पेंटेकॉस्टच्या दिवशी ऐकणाऱ्यांच्या मोठ्या गटाला पश्चात्ताप करण्याचे आव्हान केले, प्रे. कृ. 2:1-14.
- येशूने शब्बाथ दिवशी एका आंधळ्या माणसाला दृष्टी दिली आणि त्याने हे शब्बाथ दिवशी केले म्हणून दांभिक धार्मिक पुढारी संतापले, योहान 9.
- तार्ससकर शौल ख्रिस्ती लोकांना तुरूंगात डांबत असे आणि त्याच्या मृत्यूला तोच कारणीभूत होता, परंतु त्याचे परिवर्तन होऊन तो प्रेषित पौल झाला प्रे. कृ. 9:1-31.
- येशूने धर्मशील ख्रिस्ती पुढाऱ्यांच्या रूपात येणाऱ्या लांडग्यावषियी इशारा दिलेला आहे, हे पुढारी खोटे असतात, मत्तय 7:15-20.
- बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने हेरोदाला त्याच्या व्यभिचाराविषयी इशारा दिला होता. हेरोदाने योहानाला कैद करून नंतर त्याचा शिरच्छेद केला, मत्तय 14.
- येशूने परूश्यांच्या खमीराविषयी स्वत:ला नीतिमान समजणे व मनुष्यांचे नियम यापासून सावध राहण्याचा इशारा दिला, लूक 12:1; मत्तय 15:1-20.

- पौलाने इफिस येथील वडीलजनांना इशारा दिला की लांडगे (खोटे पुढारी) येऊन त्यांच्या मंडळ्यांमध्ये फूट पाडण्याचा व भ्रष्टाचार माजवण्याचा प्रयत्न करतील, प्रे. कृ. 20:28-32.
- देवाने योहानाच्या भविष्य संदेशात विश्वासणाऱ्यांचा ख्रिस्त विरोधक निर्दयपणे छळ करणार असा इशारा दिला आहे, प्रकटी 13.
- योहानाच्या दृष्टांतात पश्चात्ताप न करणाऱ्यांवर येणाऱ्या भयंकर न्यायाविषयी देखील इशारा दिला आहे, प्रकटी 16-18.
- योहानाच्या दृष्टांतात पश्चात्ताप करणाऱ्यांसाठी स्वर्गात गौरवी 'लग्नाच्या मेजवानीचे' देखील अभिवचन दिलेले आहे. प्रकटी 19
- योहानाच्या दृष्टांताने देवाच्या पांढऱ्या शुभ्र महान राजासनासमोर पश्चात्ताप न करणाऱ्यांचा होणारा अखेरचा न्यायनिवाडा प्रकट केला आहे, प्रकटी 20.
- योहानाच्या दृष्टांताने नवे आकाश व नवी पृथ्वी दाखविली, आपण यामध्ये ख्रिस्ताबरोबर राहून सदासर्वकाळ राज्य करणार आहोत, येथे अश्रू, शाप आणि कष्ट नसणार, प्रकटी 21-22.

**आमचा प्रतिसाद:**

- देवाने आम्हाला देखभाल करण्यासाठी दिलेल्या कळपावर बारिक लक्ष ठेवणे, याची सुरुवात आमच्या स्वत:च्या कुटुंबियांपासून करणे (प्रे. कृ. 20:28-32).
- आपली क्षमता सिद्ध केलेल्या जबाबदार परिपक्व व्यक्तींचेच नाव पुढारी म्हणून सुचवा, (1 तीमथ्य 3).
- तट पाडणाऱ्यांपासून दूर राहा (तीत 3:10-11).
- आमच्या मंडळीने मंडळ्या कमकुवत करणाऱ्या सर्वसामान्य चुका टाळणे अगत्याचे आहे, याबद्दलचा इशारा ख्रिस्ताने आम्हाला प्रकटी 2-3 मध्ये दिला आहे.
- दररोज पवित्र आत्म्याकडून मिळणाऱ्या नवीकरणाचा शोध घ्या (2 करिंथ 4:16-18).
- दु:ख सोसणाऱ्या विश्वासणाऱ्याना त्यांच्या सार्वकालिक प्रतिफळाविषयी खात्री घ्या (1 पेत्र 1:6-9; 1 योहान 3:1-3).

**लुसिफर** (संबंधित गोष्टी: सैतानाचे स्वर्गातून पतन, आध्यात्मिक युद्ध, सैतान येशूची परीक्षा घेतो, दुष्ट मनुष्य)

**जुना करार:** लुसिफर ''बाबेलचा राजा'' हा सुंदर देवदूत गर्वाने उन्नत्त झाला, तो सैतान आमचा शत्रू झाला, यशया 14:3-17. ही घटना निर्मितीच्या आरंभी घडली, परंतु राज्याचे दोन भाग होईपर्यंत ती प्रकट करण्यात आली नाही.

**नवा करार:** सैतान सातत्याने देवाच्या लोकांविरुद्ध युद्ध करत आहे.

- स्वर्गात युद्ध केल्यामुळे सैतानाला तसेच त्याला साथ करणाऱ्या इतर देवदूतांना स्वर्गातून हाकलून देण्यात आले, प्रकटी 12:7-9.
- सैतान येशूची मोहपरीक्षा घेतो, मत्तय 4.
- आमच्या अंत:करणातील देवाच्या वचनाचे बी हिरावून घेण्यासाठी सैतान पक्ष्यांप्रमाणे दुष्ट आत्म्यांना पाठवितो, याबद्दल येशूने इशारा दिला आहे, मत्तय 13.
- सैतान येशूचा विश्वासघात करण्यास यहूदाला प्रवृत्त करतो, योहान 13:21-30; योहान 18:1-12.
- सैतान हनन्या व सप्पीरा ह्या सारख्या विश्वासणाऱ्या ख्रिस्ती लोकांनाही पाप करायला लावतो, प्रे. कृ. 5:1-11.

**आमचा प्रतिसाद:**

- सैतानाला अडवा म्हणजे तो आमच्यापासून पळून जाईल (याकोब 4:7)
- सैतानापासून सावध असा तो गर्जणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे हे शोधीत फिरतो आहे (1 पेत्र 5:8-9).

## इस्राएलाचा बाबेलमधील बंदिवास आणि अवशिष्ट लोकांचे परत येणे या दरम्यान घडलेल्या घटना सोबत कालांतराने घडलेल्या त्यासारख्याच घटना

**इस्राएलाचा बाबेलमधील बंदिवास** (संबंधित गोष्टी: मर्दखय, दानीएल, विश्वासणाऱ्यांची सुरक्षितता, येशू उत्तम मेंढपाळ)

**जुना करार:** देवाने बंदिवासात केवळ त्याचीच उपासना करणाऱ्या यहूदी वंशातील उरलेल्या लोकांचे संरक्षण केले.

- मर्दखयने आपली भाची, शूर धाडसी एस्तेर राणीला देवाच्या शत्रूंचा नाश करण्याची योजना आखण्यास साहाय्य केले, एस्तेर (संपूर्ण पुस्तक)
- देवाने दानीएलाच्या तीन मित्रांची अग्नीच्या भट्टीतून, दानीएल 3 आणि दानीएलाची सिंहाच्या गुहेतून सुटका केली, दानीएल 6.

**नवा करार:** उत्तम मेंढपाळ असणाऱ्या येशूने आपल्या अनुयायांना सदासर्वकाळ आपल्या हातात सुरक्षित ठेवण्याचे अभिवचन दिले आहे, योहान 10:7-39.

**आमचा प्रतिसाद:** देवाने आपल्या मुलांना सदोदित आपल्या हातात ठेवावे यासाठी त्याच्या अपार दयेवर भरवंसा ठेवा, रोम 8:28-29.

**एज्रा सुधारक** (संबंधित गोष्टी: पुन:स्थापना बाबेलच्या बंदिवासातून परतणे, नहेम्या आध्यात्मिक दाने)

**जुना करार:** देवाने आपल्या लोकांची पुर्नस्थापना आणि त्याची सेवा करण्याकरिता संघटित करण्यासाठी विश्वासू पुढारी पुर्रविले:

- पारसाचा राजा कोरेश ह्याने बाबेलमधील हद्दपार केलेल्या लोकांना मंदिर व इस्राएलाच्या भूमीचा पुनरूद्धार करण्यास जाऊ दिले, एज्रा 1.
- परत आलेल्या यहूदी लोकांनी मोठ्या जयघोषाच्या नादात व अश्रूपूर्ण नेत्रांनी मंदिर पुन्हा उभारण्यास सुरुवात केली, एज्रा 3.
- नहेम्याने यरूशलेम पुन्हा उभारण्यासाठी अर्तहशस्त राजाकडे परवानगी मागितली. नहेम्याने जाऊन झालेल्या पडझडीची पाहणी केली. नहेम्या 1-2.
- नहेम्याने प्रखर विरोध असतानाही यरूशलेमेचे कोट बांधण्यासाठी हत्यारबंद मजूर कामाला लाविले, नहेम्या 3-4.
- लोकांनी देवाचे वचन लक्षपूर्वक मन लावून ऐकले, आपआपली पातके कबूल केली, आणि पश्चात्ताप केला, हे महान राष्ट्रीय नवीकरण होते, एज्रा 8-9.

**नवा करार:** देव आम्हांला आपल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे आध्यात्मिक दाने व सामर्थ्य देतो, जेणे करून आम्ही एकमेकांचे नेतृत्व, सेवा करावी आणि गरजूंना मदत करावी:

- येशूने पश्चात्ताप केलेल्या पातक्यांबरोबर जेवण केले आणि देवाची कृपा त्यांच्यापर्यंत पोहंचविली, मार्क 2:13-17.

- आम्हाला दिलेली आध्यात्मिक कृपादाने आम्ही इतरांच्या कृपादानांचा मेळ घालून शरीररूपी मंडळीत एकमेकांची सेवा करण्यासाठी प्रीतीने उपयोगात आणतो, 1 करिंथ 12:14-31.
- पौलाने आपल्या चेल्यांना इतर पुढाऱ्यांची नावे सुचवून प्रशिक्षण देण्यास आणि शिकविण्याची ही प्रक्रिया सतत सुरू ठेवून बहुगुणित करण्यास सांगितले, तीत 1:5; 2 तीमथ्य 2:2.

**आमचा प्रतिसाद:** देवाच्या कार्यासाठी आपल्या लोकांना तयार करण्यासाठी विश्वासाने योजाना आखा (इफिस 4:11-16).

- नवीन सेवकांवर काम सोपवून अत्यंत निकडीच्या ठिकाणी त्यांना पाठवा (प्रे. कृ. 13:1-3; तीत 1:5).

## येशूच्या पृथ्वीवरील जीवनाच्या काळातील घटना

**येशूचे जीवन** (संबंधित गोष्टी निवडलेले प्रेषित, जयोत्सवाने प्रवेश, वधस्तंभ, येशू उठला, येशूचे स्वर्गरोहण)

- येशूचा जन्म: मत्तय 1-2; लूक 2.
- येशूची सैतानाने मोहपरीक्षा घेतली: मत्तय 4.
- येशूने बारा शिष्यांना पाचारण केले पुढे तेच प्रेषित झाले: मत्तय 4:18-21, 9:9-13; योहान 1:35-51; मार्क 3:13-19
- येशूचे रूपांतर: मत्तय 17
- येशूचा यरूशलेमेमध्ये जयोत्सवाने प्रवशे (झावळ्याचा रविवार) मत्तय 21.
- येशूने सोपविलेली महान कामगिरी सर्व लोकांना शिष्य करा, पश्चात्तापाची व पापक्षमेची पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने घोषणा करा: मत्तय 28:18-20; मार्क 16:15-16; लूक 24:46-48; योहान 20:21-23; प्रे. कृ. 1:8.
- येशूचे स्वर्गारोहण: लूक 24:50-53.

## येशूच्या गौरवी स्वर्गरोहणानंतर घडलेल्या घटना

**पवित्र आत्म्याचे पेंटेकॉस्टच्या दिवशी आगमन** (संबंधित गोष्टी: स्तेफन, पेंटेकॉस्ट, मंडळी धर्मपरिषद, सेवकांचा चमू, न्यायनिवाडा)

- पवित्र आत्मा पेंटेकॉस्टच्या दिवशी विश्वासणाऱ्या यहूदी लोकांवर आला: प्रे. कृ. 2.
- ख्रिस्ताच्या शत्रूंनी त्यांच्या वाडवडिलांच्या काळापासून युगानुयुगे देवाला विरोधच केला, हे स्तेफनाने त्यांना जुन्या करारातील इतिहासावरून दाखविले तेव्हा त्यांनी त्याला मरेपर्यंत दगडमार केली: प्रे. कृ. 7.
- पहिली परराष्ट्रीयांची मंडळी; पालट झालेल्या परराष्ट्रीयांनाही पवित्र आत्मा मिळाला प्रे. कृ. 10.
- मिशनरी सेवकांचा पहिला चमू: प्रे. कृ. 13-14.
- पहिली आंतर मंडळीय धर्मसभा: प्रे. कृ.15.
- शेवटचा न्याय: प्रकटी 20:11-15.
- येशूने प्रभुभोजनाच्या विधीची स्थापना केली: मत्तय 26:17-29.
- येशूने गेथशेमाने बागेतील तीव्र वेदना आणि त्याची अटक: मत्तय 26:36-56.
- येशूची अनेक अधिकाऱ्यांसमोरील चौकशी: मार्क 14:55-64; योहान 18:28-40; 19:1-16.
- येशूचे वधस्तंभावरील मरण: मत्तय 27; मार्क 15; लूक 23; योहान 19:17-37.
- योहान 19:38-42.
- येशूचे पुनरूत्थान आणि दर्शन देणे: मत्तय 28; योहान 20-21

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net